स्थानिक संस्था कर (L.B.T.) म्हणजे महानगरपालिका हद्दीमध्ये मालाची आयात हि उपभोग, उपयोग वा शहरातील विक्रीसाठी व्यापारी व अन्य व्यक्ती करणार असेल अशा मालाच्या प्रवेशावर अधिनियमातील तरतुदीनुसार बसविण्यात येणारा कर असा आहे.

<u>नोंदणीकरिता उलाढालीच्या मर्यादा</u> :-
(१) व्यापारी, जो आयात करणारा असेल, आणि ज्याची मालाच्या खरेदीची किंवा विक्रीची उलाढाल, वर्षभरात रुपये ५,००० पेक्षा कमी नाही आणि त्या वर्षभरात त्याने आयात केलेल्या सर्व मालाचे मूल्य रुपये ५,००० पेक्षा कमी नाही आणि त्या वर्षभरात त्याची विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल हि रुपये १,००,००० पेक्षा कमी नाही

(२) अन्य प्रकरणी मालाच्या खरेदीची उलाढाल वर्षभरात रुपये ५,००० पेक्षा कमी नाही आणि त्याच्या सर्व विक्रीची उलाढाल वर्षभरात रुपये १,५०,००० पेक्षा कमी नाही.

(३) शहराच्या हद्दीत तात्पुरत्या स्वरूपात एखादा व्यवसाय करत असेल तर या अधिनियमाखाली व नियमाखाली असा व्यापारी किंवा व्यक्ती तात्पुरत्या नोंदणीस पात्र राहील.

<u>स्थानिक संस्था कराचा भरणा</u> :-
वार्षिक उलाढाल रुपये ५,००,०००/- वरील प्रकरणी सर्व संबधीत व्यापारयानी दैनंदिन खरेदी / विक्रीच्या नोंदी खरेदी / विक्री रजिस्टरला ठेऊन स्थानिक संस्था कराची आकारणी करून दरमहा १० तारखेच्या आत नेमून दिलेल्या बँकांमध्ये चलनाने स्थानिक संस्था कर भरणा करणे बंधनकारक आहे.